-: प्रेसनोट दिनांक - २७/०३/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक अजीज खुतबुद्दीन मुल्लाणी, वय-४३, पोलीस नाईक ब.नं. १०१७, शिरोली एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर वर्ग-३ यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार हे पुलाची शिरोली येथील रहिवाशी आहेत. त्याचा साउंड सिस्टिम व रिक्षा व्यवसाय आहे. दिनांक १३/०३/२०१९ रोजी पुलाची शिरोली येथील एका लग्न कार्यामध्ये तक्रारदार यांनी त्यांचेकडील साउंड सिस्टिम भाडयाने लावली होती. त्या ठिकाणी लग्नाचा कार्यक्रम पार पाडल्यानंतर रात्री १०.०० वा. च्या सुमारास तक्रारदार यांनी सर्व साउंड सिस्टिमचे साहित्य त्यांच्याकडील रिक्षामध्ये भरुन त्याचठिकाणी जेवण करीत बसले असताना, शिरोली एमआयडीसी पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी परशुराम कांबळे व इतर स्टाफने तक्रारदार यांना तु आचरसंहितेचे उल्लंघन केले आहेस, तुझ्यां विरुध्द कारवाई करावी लागेल. तु तुझ्याकडे असलेल्या सर्व साउंड सिस्टिमच्या साहित्यासह रिक्षा शिरोली एमआयडीसी पोलीस ठाणेस घे असे सांगून रिक्षा ताब्यात घेतली आणि तक्रारदार यांना दुस-यादिवशी सकाळी येवून भेट घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दिनांक १४/०३/२०१९ रोजी शिरोली एमआयडीसी पोलीस ठाणेस जावून पोलीस अधिकारी कांबळे यांची भेट घेण्यासाठी पोलीस ठाणेस चौकशी केली. त्यावेळी ते कामानिमित्या बाहेर गावी गेलेचे समजलेने, तक्रारदार यांनी त्याठिकाणी हजर असलेले पोलीस नाईक मुल्लाणी यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना तुझ्या विरुध्द कोर्टात खटला पाठवायला लागेल, तुला कोर्टामध्ये ५०,०००/- रुपये दंड होईल आणि तु दंड भरुन तुझे साहित्य परत घेवून जा, नाहीतर तु अस कर, मी काय असेल ते साहेबांना सांगून प्रकरण मिटवून घेतो, तु मला आणि साहेबांना मिळून ४०,०००/- रुपये दे, मग मी तुला तुझे सर्व साउंड सिस्टिमचे साहित्य परत देईन असे सांगून तक्रारदार यांच्याकडे ४०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी शिरोली एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेचे पोलीस नाईक मुल्लाणी यांचेविरुध्द आज दिनांक २७/०३/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आज दिनांक २७/०३/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये शिरोली एम.आय.डी.सी.पोलीस ठाणेचे पोलीस नाईक मुल्लाणी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे साउंड सिस्टिमचे साहित्य रिक्षासह परत देणेसाठी तडजोडीअंती ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच शिरोली एम.आय.डी.सी.पोलीस ठाणेस घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक २७/०३/२०१९ रोजी शिरोली एम.आय.डी.सी.पोलीस ठाणेचे पोलीस नाईक मुल्लाणी यांचेविरुध्द शिरोली एम.आय.डी.सी.पोलीस ठाणेस सापळयाचे आयोजन केले असता, पोलीस नाईक मुल्लाणी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे साउंड सिस्टिमचे साहित्य रिक्षासह परत देणेसाठी पंच साक्षीदार यांचे समक्ष ३०,०००/- रुपये लाचेची रक्कम मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द शिरोली एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.दिलीप बोरस्ते, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.गिरीष गोडे, पोलीस उप-अधीक्षक यांचे मार्गदर्शना नुसार, श्री.मारूती पाटील, पोलीस निरीक्षक, सहायक फौजदार शाम बुचडे, पोलीस नाईक शरद पोरे व पोलीस कॉन्स्टेबल संग्राम पाटील, रुपेश माने, चालक पोहेकॉ. सुरज अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे
दुरध्वनी कंमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३

३) श्री.गिरीष गोडे , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर ८१०८६६०७०७
०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३